Maharashtra Shikshan Samiti, Nilanga

# Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

# Dist. Latur (M.S.)

## Department of History

Organised

**Two Day National Conference**

On

**"New Research Trends in Ancient South Indian Art and Iconography - Rock Paintings, Caves, Stupas, Chaityagrihas, Temples and Sculptures"**

**"प्राचीन कालखंडातील दक्षिण भारतीय कला आणि प्रतिमा शास्त्रातील नवीन संशोधन प्रवृत्ती - शैलचित्र, लेणी, स्तूप, चैत्यगृह, मंदिरे आणि मूर्ती शिल्प"**

Sponsored by

# Indian Council of Social Science Research, New Delhi

**02nd & 03rd February, 2024**

**News Paper Clippings**

# News Paper Clipping on Press note

## कला स्थापत्य व मुर्तीशिल्पांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**प्रतिनिधी । निलंगा :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित ₹प्राचीन दक्षीण भारतातील कला आणि प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती₹ या विषयावर भारतीय शिल्प व मुर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या सामंजस्याने ही राष्ट्रीय परीषद दिनांक ०२ व ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष तथा डेक्कन कॉलेज आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापीठ, पुणे येथील माजी अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अरविंद जामखेडकर हे उपस्थित राहणार आहेत. तर बिजभाषक म्हणून हैदराबाद येथील प्लिच फाऊंडेशन आ-ॅफ इंडिया चे समन्वयक प्रा. इ. शिवानागीरेड्डी- स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी भारतीय शिल्प व मुतीर्शास्त्र संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ इतिहासकार, शिल्प व मुतीर्शास्त्राचे अभ्यासक मा. डॉ. प्रभाकर देव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत.

ही परिषद दोन दिवस चालणार असुन या परीषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प या विषयावर मा.सतीश लळीत, सिंधुदुर्ग व डॉ. आकाश गेडाम, नागपुर यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य व लयन स्थापत्य या विषयावर डॉ. माया पाटील सोलापुर, डॉ. शांता गिते-जाधवर ह्या मांडणी करणार आहेत. दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी सुरु होणा-्या तिस-्या सत्रातील मंदिर स्थापत्य कला व हिंदू मुर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ. आत्माराम शिंदे, प्रा एम.पी. सागवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द व जैन मुर्ती कला या विषयावर असुन या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर व परभणी येथील डॉ. नितीन बावळे हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे विशेष सत्र निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिराच्या ठिकाणी प्रत्यक्ष मंदिर व मुतीर्शास्त्राचा अभ्यास या विषयावर डॉ.अर-विंद सोनटक्के, नांदेड यांच्या उपस्थितीत होणार आहे. या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातुर येथील प्रसिध्द इतिहासकार व जेष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी होणार असून विविध विषयांवर शोधनिबंधाचे वाचन करणार आहेत.

रेणाए झाल्याबद्द **दै.आदर्श भारत** निवड चा सत्कार लातूर ि

**पुण्य नगरी**

## महाराष्ट्र महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

**निलंगा :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्यावतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित प्राचीन दक्षिण भारतातील कला आणि प्रतिमा शाखातील नविन संशोधन प्रवृती या विषयावर भारतीय शिल्प व मूर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या सामंजस्याने ही राष्ट्रीय परिषद दि. २ व ३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ माधव कोलपुके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून, परिषदेस भारतीय इतिहास संशोधन प्रा.डॉ. अरविंद जामखेडकर, प्लिच फाऊंडेशन ऑफ इंडियाचे समन्वयक प्रा. इ. शिवानागौरेड्डी- स्थपती, ज्येष्ठ इतिहासकार डॉ. प्रभाकर देव, मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वरवंटीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ही परिषद दोन दिवस चालणार असून या परिषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प या विषयावर सतीश लळीत सिंधुदुर्ग व आकाश गेडाम यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य व लयन स्थापत्य या विषयावर डॉ. माया पाटील, डॉ. शांता गिते या मांडणी करणार आहेत.

दि ३ रोजीच्या तिसऱ्या सत्रातील मंदिर स्थापत्य कला व हिंदू मूर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ. आत्माराम शिंदे, प्रा एम.पी. सागवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द व जैन मूर्ती कला या विषयावर असून या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर व परभणी येथील डॉ. नितीन बावळे हे उपस्थित राहणार आहेत, असे प्राचार्य डॉ कोलपुके यांनी सांगितले.

समारोप समारंभासाठी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी होणार असून विविध विषयांवर शोधनिबंधाचे वाचन करणार आहेत. या परिषदेत इतिहास शिल्प, कला व मूर्तीशास्त्राच्या अभ्यासकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी केले.

Smart Latur Edition
Feb 1, 2024 Page No. 02
Powered by : eReleGo.com

# महाराष्ट्र महाविद्यालयात कला स्थापत्य व मुर्तीशिल्पांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

निलंगा : येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित १प्राचीन दक्षीण भारतातील कला आणि प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती१ या विषयावर भारतीय शिल्प व मुर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या सामंजस्याने ही राष्ट्रीय परीषद दिनांक ०२ व ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष तथा डेक्कन कॉलेज आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापीठ, पुणे येथील माजी अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अरविंद जामखेडकर हे उपस्थित राहणार आहेत. तर बिजभाषक म्हणून हैदराबाद येथील प्लिच फाऊंडेशन ऑफ इंडिया चे समन्वयक प्रा. इ. शिवानागीरेड्डी-स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी भारतीय शिल्प व मुर्तीशास्त्र संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ इतिहासकार, शिल्प व मुर्तीशास्त्राचे अभ्यासक मा. डॉ. प्रभाकर देव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत.

ही परिषद दोन दिवस चालणार असुन या परीषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प या विषयावर मा.सतीश लळीत, सिंधुदुर्ग व डॉ. आकाश गेडाम, नागपुर यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य व लयन स्थापत्य या विषयावर डॉ. माया पाटील सोलापुर, डॉ. शांता गिते-जाधवर ह्या मांडणी करणार आहेत. दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी सुरु होणा-या तिस-या सत्रातील मंदिर स्थापत्य कला व हिंदू मुर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ. आत्माराम शिंदे, प्रा एम.पी. सागवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द व जैन मुर्ती कला या विषयावर असुन या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर व परभणी येथील डॉ. नितीन बावळे हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे विशेष सत्र निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिराच्या ठिकाणी प्रत्यक्ष मंदिर व मुतीशास्त्राचा अभ्यास या विषयावर डॉ.अरविंद सोनटक्के, नदिड यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातुर येथील प्रसिध्द इतिहासकार व जेष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी होणार असुन विविध विषयांवर शोधनिबंधाचे वाचन करणार आहेत. त्याचबरोबर नाणी संग्राहक मा. सौदागर बेवनाळे यांचे नाणी प्रदर्शन व मा. डॉ सुनिल पुरी यांचे औसा किल्ला व लातुर जिल्ह्यातील मंदिर व मुर्तीशिल्प यावर आधारीत भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. या दोन दिवशीय परिषदेत इतिहास, शिल्प, कला व मुर्तीशास्त्राच्या अभ्यासकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रस्तुत विषयावर साधक बाधक चर्चा घडवून, नवसंशोधनाच्या माध्यमातून कला, शिल्प व मुर्तीशास्त्र या विषयासाठी योगदान द्यावे असे आवाहन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय पाटील निलंगेकर, संस्थेचे सचीव मा. बब्रुवान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. माधव कोलपुके, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. सुभाष बेंजलवार यांनी आवाहन केले आहे.

---



# महाराष्ट्र महाविद्यालयात कला स्थापत्य व मुर्तीशिल्पांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**निलंगा/प्रतिनिधी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित प्राचीन दक्षीण भारतातील कला आणि प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती या विषयावर भारतीय शिल्प व मुर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या सामंजस्याने ही राष्ट्रीय परीषद दिनांक ०२ व ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे.



या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष तथा डेक्कन कॉलेज आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापीठ, पुणे येथील माजी अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अरविंद जामखेडकर हे उपस्थित राहणार आहेत. तर बिजभाषक म्हणून हैदराबाद येथील प्लिच फाऊंडेशन ऑफ इंडिया चे समन्वयक प्रा. इ. शिवानागीरेड्डी– स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी भारतीय शिल्प व मुर्तीशास्त्र संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ इतिहासकार, शिल्प व मुर्तीशास्त्राचे अभ्यासक मा. डॉ. प्रभाकर देव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत.

ही परिषद दोन दिवस चालणार असुन या परीषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प या विषयावर मा.सतीश लळीत, सिंधुदुर्ग व डॉ. आकाश गेडाम, नागपुर यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य व लयन स्थापत्य या विषयावर डॉ. माया पाटील सोलापुर, डॉ. शांता गिते–जाधवर ह्या मांडणी करणार आहेत. दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी सुरु होणाऱ्या तिसऱ्या सत्रातील मंदिर स्थापत्य कला व हिंदू मुर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ. आत्माराम शिंदे, प्रा एम.पी. सागवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द व जैन मुर्ती कला या विषयावर असुन या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर व परभणी येथील डॉ. नितीन बावळे हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे विशेष सत्र निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिराच्या ठिकाणी प्रत्यक्ष मंदिर व मुर्तीशास्त्राचा अभ्यास या विषयावर डॉ.अरविंद सोनटक्के, नांदेड यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातुर येथील प्रसिध्द इतिहासकार व जेष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी होणार असून विविध विषयांवर शोधनिबंधाचे वाचन करणार आहेत. त्याचबरोबर नाणी संग्राहक मा. सौदागर बेवनाळे यांचे नाणी प्रदर्शन व मा. डॉ सुनिल पुरी यांचे औसा किल्ला व लातुर जिल्ह्यातील मंदिर व मुर्तीशिल्प यावर आधारीत भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. या दोन दिवशीय परिषदेत इतिहास, शिल्प, कला व मुर्तीशास्त्राच्या अभ्यासकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रस्तुत विषयावर साधक बाधक चर्चा घडवून, नवसंशोधनाच्या माध्यमातून कला, शिल्प व मुर्तीशास्त्र या विषयासाठी योगदान द्यावे असे आवाहन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय पाटील निलंगेकर, संस्थेचे सचीव मा. बब्रुवान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. माधव कोलपुके, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. सुभाष बेंजलवार यांनी आवाहन केले आहे.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
01 Feb 2024 - Page 16

# निलंग्यात मुर्तीशिल्पांवर दोन दिवसीय परिषद

**तभा वृत्तसेवा-**
**निलंगा दि.३१ जानेवारी-**
महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या वतीने प्राचीन दक्षीण भारतातील कला, प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती विषयावर भारतीय शिल्प, मुर्तीकला संशोधन परिषद,संस्थेच्या सामंजस्याने, राष्ट्रीय परीषद २ व ३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, विजय पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डेक्कन कॉलेज, आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापीठ, पुणे येथील माजी अध्यक्ष, डॉ. अरविंद जामखेडकर हे उपस्थित राहणार आहेत. बिजभाषक म्हणून हैदराबाद येथील प्लिच फाऊंडेशन ऑफ इंडियाचे समन्वयक प्रा. शिवानागी रेड्डी-स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी भारतीय शिल्प, मुर्तीशास्त्र संशोधन संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर देव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत. ही परिषद दोन दिवस चालणार आहे.परीषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प, विषयावर सतीश लळीत, सिंधुदुर्ग, डॉ. आकाश गेडाम, नागपुर यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य, लयन स्थापत्य विषयावर डॉ. माया पाटील सोलापुर, शांता गिते ह्या मांडणी करणार आहेत. ३ फेब्रुवारी रोजी सुरु होणाऱ्या तिसऱ्या सत्रातील मंदिर स्थापत्य कला, हिंदू मुर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ.आत्माराम शिंदे, प्रा एम. पी. सागवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द, जैन मुर्ती कला या विषयावर आहे. या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर,परभणी येथील डॉ. नितीन बावळे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे विशेष सत्र निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिराच्या ठिकाणी प्रत्यक्ष मंदिर, मुर्तीशास्त्राचा अभ्यास या विषयावर डॉ. अरविंद सोनटक्के, नांदेड यांच्या उपस्थितीत होणार आहे. या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातुर येथील इतिहासकार, जेष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे, उपस्थित राहणार आहेत.परिषदेसाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यातील प्राध्यापक, संशोधक,अभ्यासक सहभागी होणार आहेत. विविध विषयांवर शोध निबंधाचे वाचन करणार आहेत. त्याचबरोबर नाणी संग्राहक सौदागर बेवनाळे यांचे नाणी प्रदर्शन डॉ सुनिल पुरी यांचे औसा किल्ला, लातुर जिल्ह्यातील मंदिर मुर्तीशिल्प यावर आधारीत भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. या दोन दिवशीय परिषदेत इतिहास, शिल्प, कला मुर्तीशास्त्राच्या अभ्यासकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रस्तुत विषयावर साधक बाधक चर्चा घडवून, नवसंशोधनाच्या माध्यमातून कला, शिल्प मुर्तीशास्त्र या विषयासाठी योगदान द्यावे. असे आवाहन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, संस्थेचे सचिव बब्रुवान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. सुभाष बेंजलवार यांनी आवाहन केले आहे.

---

दिव्य मराठी
लातूर जिल्हा 01-02-2024

# कला स्थापत्य व मूर्ती शिल्पांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

## २ व ३ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी | निलंगा**

येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शाखा संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित प्राचीन दक्षिण भारतातील कला आणि प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती या विषयावर भारतीय शिल्प व मुर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या सामंजस्याने ही राष्ट्रीय परिषद २ व ३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष तथा डेक्कन कॉलेज आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापीठ, पुणे येथील माजी अध्यक्ष प्रा. डॉ. अरविंद जामखेडकर उपस्थित राहणार आहेत.

बिजमापक म्हणून हैदराबाद येथील प्लिच फाऊंडेशन ऑफ इंडिया चे समन्वयक प्रा . इ . शिवानागीरेड्डी स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी मुर्तीशास्त्राचे अभ्यासक डॉ. प्रभाकर देव, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत. ही परिषद दोन दिवस चालणार आहे.

# महाराष्ट्र महाविद्यालयात कला स्थापत्य व मुर्तीशिल्पांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**निलंगा /प्रतिनिधी**

येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या द्वारे प्रायोजित "प्राचीन दक्षिण भारतातील कला आणि प्रतिमा शास्त्रातील नविन संशोधन प्रवृत्ती" या विषयावर भारतीय शिल्प व मुर्तीकला संशोधन परिषद या संस्थेच्या समंजस्याने ही राष्ट्रीय परीषद दिनांक ०२ व ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष, मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटनासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषद नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष तथा डेक्कन कॉलेज आणि पदव्युत्तर संशोधन संस्था स्वायत्त विद्यापिठ, पुणे येथील माजी अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अरविंद जामखेडकर हे उपस्थित राहणार आहेत. तर बिजभाषक म्हणून हैदराबाद येथील शिल्प फाउंडेशन ऑफ इंडिया चे समन्वयक प्रा. इ. शिवनागीरेड्डी- स्थपती यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन समारंभासाठी भारतीय शिल्प व मुर्तीशास्त्र संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ इतिहासकार, शिल्प व मुर्तीशास्त्राचे अभ्यासक मा. डॉ. प्रभाकर देव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ. राहुल वरवंटीकर उपस्थित राहणार आहेत.

ही परिषद दोन दिवस चालणार असून या परीषदेत चार सत्रांपैकी पहिल्या सत्रात कोकणातील कातळशिल्प या विषयावर मा.सतीश लळीत, सिंधुदुर्ग व डॉ. आकाश गेडाम, नागपूर यांचे मार्गदर्शन होणार आहे. द्वितीय सत्रातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर स्थापत्य व लयन स्थापत्य या विषयावर डॉ. माया पाटील सोलापूर, डॉ. शांता गिते-जाधवर ह्या मांडणी करणार आहेत.

दि.०३ फेब्रुवारी रोजी सुरू होणाऱ्या तिसऱ्या सत्रातील मंदिर स्थापत्य कला व हिंदू मुर्तीकला या विषयावर परभणी येथील डॉ. आत्माराम शिंदे, प्रा एम.पी. साळवे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चौथे सत्र बौध्द व जैन मुर्ती कला या विषयावर असून या सत्रासाठी डेक्कन कॉलेज पुणे येथील प्रा. श्रीकांत गणवीर व परभणी येथील डॉ. नितीन बावळे हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे विशेष सत्र निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिराच्या ठिकाणी प्रत्यक्ष मंदिर व मुर्तीशास्त्राचा अभ्यास या विषयावर डॉ.अरविंद सोनटक्के, नांदेड यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर येथील प्रसिध्द इतिहासकार व जेष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी होणार असून विविध विषयांवर शोधनिबंधाचे वाचन करणार आहेत. त्याबरोबर नाणी संग्राहक मा. सौदागर बेवनाळे यांचे नाणी प्रदर्शन व मा. डॉ सुनिल पुरी यांचे औसा जिल्हा व लातूर जिल्ह्यातील मंदिर व मुर्तीशिल्प यावर आधारीत चित्रिकार्याचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. या दोन दिवसीय परिषदेत इतिहास, शिल्प, कला व मुर्तीशास्त्राच्या अभ्यासकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रस्तुत विषयावर साधक बाधक चर्चा घडवून, नवसंशोधनाच्या माध्यमातून कला, शिल्प व मुर्तीशास्त्र या विषयासाठी योगदान द्यावे असे आवाहन अध्यक्ष, मा. विजय पाटील निलंगेकर, संस्थेचे सचिव मा. बब्रुवान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. माधव कोलपुके, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. सुभाष बेंजलवार यांनी आवाहन केले आहे.

**News Clipping on Inaugural Ceremony**

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
04 Feb 2024 - Page 12



## महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**

संशोधन शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तीचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय, इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. यावेळी डॉ. राहुल वरवंटीकर, डॉ. अरविंद सोनटक्के यांचीही भाषणे झाली. यावेळी विचार मंचावर प्राचार्य डॉ.माधव कोलपुके, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. सोमेश श्रीवास्तव यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. सुभाष बेंजलवार, आभार डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

दिव्य मराठी
लातूर जिल्हा 03-02-2024

# प्रतिमा विज्ञान समजून घेऊन मूर्तीचा अभ्यास केला पाहिजे

## निलंगा येथे डॉ. जामखेडकर यांचे मार्गदर्शन



निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात बोलताना डॉ. अरविंद जामखेडकर.

**प्रतिनिधी** | निलंगा

संशोधन हा शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तीचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते.

प्रा. ई.शिवनागीरेड्डी म्हणाले, दक्षिण भारतीय कला आणि प्रतिमा शास्त्रातील शैलचित्र, लेणी, स्तूप, चैत्यगृह, मंदिरे आणि मूर्तीशिल्प हे फार वैभवशाली परंपरा आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम देशातील तरुण संशोधक पिढीचे आहे. वेगवेगळ्या कालखंडात

### अर्थ समजून संशोधन करा

नाणे ही प्रतिमा वा मुद्रा आहे. पण ते ज्याच्या हातात पडेल तो त्याचा वेगवेगळा अर्थ लावून वापर करतो. त्याने लावलेला हा वेगवेगळा अर्थ समजून घेऊनच संशोधन केले पाहिजे. उत्तर भारताच्या संदर्भात मूर्ती, शिल्प, लेणी, स्तूप, चैत्यगृह याबाबतीत भरपूर ऐतिहासिक मांडणी झालेली आहे. दक्षिण भारताच्या बाबतीत अशी मांडणी झाल्याचे प्रमाण फार कमी आहे. ते डोळ्यासमोर ठेवून या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दक्षिण भागाचेही फार मोठे योगदान आहे ते संशोधकांनी शोधावे असे डॉ. अरविंद जामखेडकर म्हणाले.

नवीन शिल्प कसे निर्माण झाले याबद्दल तेलंगाना, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या भागातील शिल्प निर्मितीच्या संदर्भात ऐतिहासिक माहिती त्यांनी दिली. विजयकुमार पाटील, अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के उपस्थित होते.

पुण्य नगरी

# प्रतिमा विज्ञान समजून घेतल्याशिवाय मूर्तीचा अभ्यास करता येणार नाही : डॉ. जामखेडकर




**निलंगा :** संशोधन हा शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तीचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले.

येथील महाराष्ट्र महाविद्यालय, इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भागवत पौळ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. सोमेश श्रीवास्तव उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ जामखेडकर म्हणाले, नाणे ही प्रतिमा वा मुद्रा आहे; पण ते ज्याच्या हातात पडेल, तो त्याचा वेगवेगळा अर्थ लावून वापर करतो. त्याने लावलेला हा वेगवेगळा अर्थ समजून घेऊनच संशोधन केले पाहिजे. उत्तर भारताच्या संदर्भात मूर्ती, शिल्प, लेणी, स्तूप, चैत्यगृह याबाबतीत भरपूर ऐतिहासिक मांडणी झालेली आहे. दक्षिण भारताच्या बाबतीत अशी मांडणी झाल्याचे प्रमाण फार कमी आहे, ते डोळ्यासमोर ठेवून या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, ही कौतुकास्पद बाब असल्याचे म्हणत कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात निलंगेकर म्हणाले, भारतीय मूर्ती व शिल्पकला संशोधन परिषदेशी झालेल्या सामंजस्य करारामधून होत असलेल्या या चर्चासत्राच्या निमित्ताने प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांसाठी नव्या संशोधनाच्या दिशा खुल्या होतील. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वरवंटीकर, मूर्ती कलेचे अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के यांची भाषणे झाली. प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी परिषदेसाठी आलेल्या प्रमुख उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार यांनी केले. आभार डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

लातूर समाचार
Page 4
03 Feb 2024

# प्रतिमा विज्ञान समजून घेतल्याशिवाय मूर्तीचा अभ्यास करता येणार नाही–डॉ.अरविंद जामखेडकर



निलंगा/आयुब बागवानः– संशोधन हा शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तीचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय, इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. ते पुढे म्हणाले की, नाणे ही प्रतिमा वा मुद्रा आहे पण ते ज्याच्या हातात पडेल तो त्याचा वेगवेगळा अर्थ लावून वापर करतो. त्याने लावलेला हा वेगवेगळा अर्थ समजून घेऊनच संशोधन केले पाहिजे. उत्तर भारताच्या संदर्भात मूर्ती, शिल्प, लेणी, स्तूप, चैत्यगृह याबाबतीत भरपूर ऐतिहासिक मांडणी झालेली आहे. दक्षिण भारताच्या बाबतीत अशी मांडणी झाल्याचे प्रमाण फार कमी आहे, ते डोळ्यासमोर ठेवून या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दक्षिण भागाचेही फार मोठे योगदान आहे ते संशोधकांनी शोधावे असेही ते म्हणाले.

या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजारोपण हैदराबाद येथील प्रोफेसर ई.शिवनागिरेड्डी यांनी केले. ते म्हणाले की, दक्षिण भारतीय कला आणि प्रतिमा शास्त्रातील शैलचित्र, लेणी, स्तूप, चैत्यगृह, मंदिरे आणि मूर्तीशिल्प हे फार वैभवशाली परंपरा आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम देशातील तरुण संशोधक पिढीचे आहे. आपल्या बीज भाषणातून त्यांनी दक्षिण भारतातील सर्व ऐतिहासिक कला शिल्पांचा इतिहास संबोधित केला. वेगवेगळ्या कालखंडात नवीन शिल्प कसे निर्माण झालेत याबद्दल तेलंगाना, कर्नाटक, आंध्राप्रदेश आणि तामिळनाडू या भागातील शिल्प निर्मितीच्या संदर्भात ऐतिहासिक माहिती त्यांनी नोंदविली. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजयकुमार शिवाजीराव पाटील निलंगेकर हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, भारतीय मूर्ती व शिल्पकला संशोधन परिषदेशी झालेल्या सामंजस्य करारामधून होत असलेल्या या चर्चासत्राच्या निमित्ताने प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांसाठी नव्या संशोधनाच्या दिशा खुल्या होतील. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वरवंटीकर, मूर्ती कलेचे अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के यांची समायोजित भाषणे झालीत. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव कोलपुके,औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, लखनऊ येथून उपस्थित असलेले डॉ. सोमेश श्रीवास्तव यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी परिषदेसाठी आलेल्या प्रमुख मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख तथा परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार यांनी केले तर आभार डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

दैनिक राजधर्म

# प्रतिमा विज्ञान समजून घेतल्याशिवाय मूर्तीचा अभ्यास करता येणार नाहीःडॉ.अरविंद जामखेडकर



**निलंगा,प्रतिनिधी**ःसंशोधन हा शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तीचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय, इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. ते पुढे म्हणाले की, नाणे ही प्रतिमा वा मुद्रा आहे पण ते ज्याच्या हातात पडेल तो त्याचा वेगवेगळा अर्थ लावून वापर करतो. त्याने लावलेला हा वेगवेगळा अर्थ समजून घेऊनच संशोधन केले पाहिजे. उत्तर भारताच्या संदर्भात मूर्ती, शिल्प, लेणी, स्तूप, चैत्यगृह याबाबतीत भरपूर ऐतिहासिक मांडणी झालेली आहे. दक्षिण भारताच्या बाबतीत अशी मांडणी झाल्याचे प्रमाण फार कमी आहे, ते डोळ्यासमोर ठेवून या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दक्षिण भागाचेही फार मोठे योगदान आहे ते संशोधकांनी शोधावे असेही ते म्हणाले.या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजारोपण हैदराबाद येथील प्रोफेसर ई.शिवनागिरेड्डी यांनी केले. ते म्हणाले की, दक्षिण भारतीय कला आणि प्रतिमा शास्त्रातील शैलचित्र, लेणी, स्तूप, चैत्यगृह, मंदिरे आणि मूर्तीशिल्प हे फार वैभवशाली परंपरा आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम देशातील तरुण संशोधक पिढीचे आहे. आपल्या बीज भाषणातून त्यांनी दक्षिण भारतातील सर्व ऐतिहासिक कला शिल्पांचा इतिहास संबोधित केला. वेगवेगळ्या कालखंडात नवीन शिल्प कसे निर्माण झालेत याबद्दल तेलंगाना, कर्नाटक, आंध्राप्रदेश आणि तामिळनाडू या भागातील शिल्प निर्मितीच्या संदर्भात ऐतिहासिक माहिती त्यांनी नोंदविली. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री.विजयकुमार शिवाजीराव पाटील निलंगेकर हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, भारतीय मूर्ती व शिल्पकला संशोधन परिषदेशी झालेल्या सामंजस्य करारामधून होत असलेल्या या चर्चासत्राच्या निमित्ताने प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांसाठी नव्या संशोधनाच्या दिशा खुल्या होतील. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वरवंटीकर, मूर्ती कलेचे अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के यांची समायोजित भाषणे झालीत. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव कोलपुके,औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, लखनऊ येथून उपस्थित असलेले डॉ. सोमेश श्रीवास्तव यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी परिषदेसाठी आलेल्या प्रमुख मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख तथा परिषदेचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार यांनी केले तर आभार डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 6
04 Feb 2024

**डॉ. अरविंद जामखेडकर । महाराष्ट्र महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद**

# प्रतिमा विज्ञान समजल्यास मूर्तींचा अभ्यास शक्य

**निलंगा : प्रतिनिधी**



संशोधन हा शिक्षणाचा एक भाग आहे. दुसऱ्यात योग्यता निर्माण करणे म्हणजे शिक्षण. अशा प्रकारचे संशोधन होताना परंपरा, प्रतिमा यातील विज्ञान समजून घेतले तरच मूर्तींचा अभ्यास करता येईल, असे मत भारतीय इतिहास संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष डॉ. अरविंद जामखेडकर यांनी व्यक्त केले .

महाराष्ट्र महाविद्यालय, इतिहास विभाग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील निलंगेकर हे उपस्थित होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. राहुल वरवंटीकर, मूर्ती कलेचे अभ्यासक डॉ. अरविंद सोनटक्के, प्राचार्य डॉ. इमाधव कोलपुके, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. सोमेश श्रीवास्तव यांची उपस्थिती होती.

नाणे ही प्रतिमा वा मुद्रा आहे, पण ते ज्याच्या हातात पडेल तो त्याचा वेगवेगळा अर्थ लावून वापर करतो. त्याने लावलेला हा वेगवेगळा अर्थ समजून घेऊनच संशोधन केले पाहिजे, असे सांगून डॉ. जामखेडकर म्हणाले की, उत्तर भारताच्या संदर्भात मूर्ती, शिल्प, लेणी, स्तूप, चैत्यगृह याबाबतीत भरपूर ऐतिहासिक मांडणी झालेली आहे. दक्षिण भारताच्या बाबतीत अशी मांडणी झाल्याचे प्रमाण फार कमी आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दक्षिण भागाचेही फार मोठे योगदान आहे ते संशोधकांनी शोधावे, असे ते म्हणाले.

प्रोफेसर ई.शिवनागिरेड्डी म्हणाले की, दक्षिण भारतीय कला आणि प्रतिमा शास्त्रातील शैलचित्र, लेणी, स्तूप, चैत्यगृह, मंदिरे आणि मूर्तीशिल्प हे फार वैभवशाली परंपरा आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम देशातील तरुण संशोधक पिढीचे आहे. आपल्या बीज भाषणातून त्यांनी दक्षिण भारतातील सर्व ऐतिहासिक कला शिल्पांचा इतिहास संबोधित केला. वेगवेगळ्या कालखंडात नवीन शिल्प कसे निर्माण झालेत याबद्दल तेलंगाना, कर्नाटक, आंध्राप्रदेश आणि तामिळनाडू या भागातील शिल्प निर्मितीच्या संदर्भात ऐतिहासिक माहिती त्यांनी नोंदविली. यावेळी डॉ. राहुल वरवंटीकर, डॉ. अरविंद सोनटक्के यांची समायोजित भाषणे झालीत.

अध्यक्षीय समारोपात निलंगेकर म्हणाले की, भारतीय मूर्ती व शिल्पकला संशोधन परिषदेशी झालेल्या सामंजस्य करारामधून होत असलेल्या या चर्चासत्राच्या निमित्ताने प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांसाठी नव्या संशोधनाच्या दिशा खुल्या होतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष बेंजलवार यांनी केले. तर आभार डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

## News Clipping on Valedictory Ceremony

05 Feb Page 5 Epaper
05 Feb 2024

सांज दैनिक
सारथी समाचार

# कला स्थापत्य व मूर्तीशास्त्र परिषदेची सांगता

**दक्षिण भारताच्या इतिहासाचे नवे पान निर्माण होईल : डॉ. सोमनाथ रोडे**



**निलंगा/प्रतिनिधी** : मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचा अभ्यास करणारे अभ्यासक, संशोधकांची महाराष्ट्रात कमी नाही परंतु प्राचीन इतिहास अभ्यासक व संशोधकांची मात्र प्रचंड वाणवा आहे, अशा संशोधकांची संख्या वाढली पाहिजे. मूर्ती व स्थापत्यशास्त्रावर आधारित झालेली ही इतिहासाची राष्ट्रीय परिषद दक्षिणेच्या इतिहासात नवे पान निर्माण करेल असा आशावाद इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केला. ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परीषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, संशोधकांनी मूळ साधनांचा वापर करून संशोधन करावे. मराठवाड्यात अनेक मंदिरे, शिल्प, स्थापत्य कलेचे उत्तम नमुने उपलब्ध आहेत, त्यांची पडझड होत आहे त्याचे संशोधन झाले तर भावी पिढीला ते संदर्भासाठी उपयुक्त होईल.

दोन दिवस चाललेल्या या राष्ट्रीय परिषदेसाठी इतिहास अभ्यासक, संशोधकांनी आपले संशोधनपर लेख सप्रमाण सादर केले. मंदिर स्थापत्य आणि मुर्तीशास्त्र या विषयाच्या अनुषंगाने दक्षिण भारतातील मंदिर स्थापत्य शैली व मूर्तीशास्त्र या विषयांवर संशोधन पर लेख सादर झालेत. यावेळी स्वा. रा. ती.म. विद्यापीठाच्या परभणी येथील उपकेंद्रातील संचालक डॉ.आत्माराम शिंदे यांनी पूर्वीच्या तगर आणि आजच्या तेर येथील मंदिरावर भाष्य केले. ते म्हणाले की, हे चाफाकार पद्धतीचे मंदिर आहे. महाराष्ट्रातील संस्कृतीची सुरुवात मराठवाड्यातूनच झाली असावी. त्यामुळे हे पहिले मंदिर असावे. कालांतराने मंदिर निर्मितीच्या शैली बदलल्या. पुरातन असलेली मंदिरे नष्ट होत आहेत हा सांस्कृतिक वारसा तरुण संशोधकांनी जपावा, शोधावा व जगासमोर आणावा अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या परीषदेत डेक्कन कॉलेज, पुणे येथील डॉ श्रीकांत गणवीर यांनी बौद्ध स्तूपाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. तेलंगाना आणि पॅरिस येथील शिल्पसंग्रहालयातील शिल्पांच्या आधारे त्यांनी सिद्धार्थ गौतमाचा जन्म, यक्ष, शाक्य परंपरा, लोकपाल,धम्मचक्र प्रवर्तक सूक्त यावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर खरोसा लेणी अभ्यास सत्रांमध्येही अभ्यासपुर्ण मांडणी करताना कोकण परीसरात आढळणारा जांभा दगड या लेणीपरासरात असुन या लेणी वेरुळ लेणींची प्रारंभिक अवस्था असावी असे मत व्यक्त केले. सकाळच्या निलंगा शहरातील प्रत्यक्ष मंदिर पाहणी अभ्यास सत्रात डॉ. अरविंद सोनटक्के यांनी मंदिर स्थापत्य व मंदिराच्या आतील व बाह्यांगावरील प्रतीमांवर 'सूरसुंदरी, देवांगना की नायिका' या विषयाच्या अनुषंगाने सप्रमाण मांडणी केली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डौ. नितीन बावळे यांनी केला.

या दोन दिवशी या इतिहास परिषदेतून अभ्यासक, विद्यार्थ्यांना एक वेगळी दृष्टी मिळाली. मंदिराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला अशी भावना समारोप समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी व्यक्त केली. समारोपप्रसंगी विचार मंचावर मराठवाडा इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ.नारायण सूर्यवंशी, महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, इतिहास विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. मनोहर सांगवे, चर्चासत्राचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, प्रतिमा शास्त्र संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. अरविंद सोनटक्के, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, स्वा. रा.ती. म. वि. नांदेड इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष राहुल वरवंटीकर, आदींची उपस्थिती होती.

या परीषदेचे व समारोप समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. अजित मुळजकर, डॉ. नरेश पिनमकर, डॉ. हंसराज भोसले, डॉ.गोविंद शिवशेट्टे यांनी केले तर उपस्थिताचे आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले. या परिषदेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
05 Feb 2024 - Page 16

# इतिहास संशोधकांची संख्या वाढली पाहिजे : डॉ.रोडे

## महाराष्ट्र महाविद्यालयात कला स्थापत्य व मूर्तीशास्त्र परिषदेची सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.४ फेब्रुवारी -**

मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचा अभ्यास करणारे अभ्यासक, संशोधकांची महाराष्ट्रात कमी नाही परंतु प्राचीन इतिहास अभ्यासक व संशोधकांची म त्र प्रचंड वाणवा आहे, अशा संशोधकांची संखया वाढली पाहिजे. मूर्ती व स्थापत्यशास्त्रावर आधारित झालेली ही इतिहासाची राष्ट्रीय परिषद दक्षिणेच्या इतिहासात नवे पान निर्माण करेल, असा आशावाद इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केला.

ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परीषदेच्या सम ारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

दोन दिवस चाललेल्या या राष्ट्रीय परिषदेसाठी इतिहास अभ्यासक, संशोधकांनी आपले संशोधनपर लेख सप्रमाण सादर केले. यावेळी स्वा. रा. ती.म.विद्यापीठाच्या परभणी येथील उपकेंद्रातील संचालक डॉ. आत्माराम शिंदे यांनी पूर्वीच्या तगर आणि आजच्या तेर येथील मंदिरावर भाष्य केले. या परीषदेत डेक्कन कॉलेज, पुणे येथील डॉ श्रीकांत गणवीर यांनी बौद्ध स्तूपाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. सकाळच्या निलंगा शहरातील प्रत्यक्ष मंदिर पाहणी अभ्यास सत्रात डॉ.अरविंद सोनटक्के यांनी मंदिर स्थापत्य व मंदिराच्या आतील व बाह्यांगावरील प्रतीमांवर 'सूरसुंदरी, देवांगना की नायिका' या विषयाच्या अनुषंगाने सप्रमाण मांडणी केली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डौ. नितीन बावळे यांनी केला. समारोप सम रंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. समारोपप्रसंगी विचार मंचावर डॉ.नारायण सूर्यवंशी, डॉ. शिवाजीराव गायकवाड, प्रा. मनोहर सांगवे, डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. अरविंद सोनटक्के, चे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, राहुल वरवंटीकर, आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ.अजित मुळजकर, डॉ. नरेश पिनमकर, डॉ. हंसराज भोसले, डॉ.गोविंद शिवशेट्टे यांनी केले तर उपस्थिताचे आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 7
05 Feb 2024



# राष्ट्रीय परिषद दक्षिण भारतासाठी ऐतिहासिक ठरेल

**निलंगा : प्रतिनिधी**

## ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रोडे यांचा आशावाद, महाराष्ट्रमध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचा अभ्यास करणारे अभ्यासक, संशोधकांची महाराष्ट्रात कमी नाहीत परंतु प्राचीन इतिहास अभ्यासक व संशोधकांची मात्र प्रचंड वाणवा आहे, अशा संशोधकांची संख्या वाढली पाहिजे. मूर्ती व स्थापत्यशास्त्रावर आधारित झालेली ही इतिहासाची राष्ट्रीय परिषद दक्षिणेच्या इतिहासात नवे पान निर्माण करेल असा आशावाद इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केला.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परीषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्वा. रा. ती.म. विद्यापीठाच्या परभणी येथील उपकेंद्रातील संचालक डॉ.आत्माराम शिदे यांनी पूर्वीच्या तगर आणि आजच्या तेर येथील मंदिरावर भाष्य केले. या परीषदेत डेक्कन कॉलेज, पुणे येथील डॉ श्रीकांत गणवीर यांनी बौद्ध स्तुपाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. खरोसा लेणी, वेरुळ लेणीं याबद्दल भाष्य केले. सकाळच्या निलंगा शहरातील प्रत्यक्ष मंदिर पाहणी अभ्यास सत्रात डॉ. अरविंद सोनटक्के यांनीही सप्रमाण मांडणी केली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ नितीन बावळे यांनी केला.

या दोन दिवशी या इतिहास परिषदेतून अभ्यासक,विद्यार्थ्यांना एक वेगळी दृष्टी मिळाली. मंदिराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला अशी भावना समारोप समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी व्यक्त केली. विचार मंचावर मराठवाडा इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ.नारायण सूर्यवंशी, माजी उपप्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, इतिहास विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. मनोहर सांगवे, चर्चासत्राचे संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार, प्रतिमा शास्त्र संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. अरविंद सोनटक्के, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, स्वा. रा.ती. म. वि. नांदेड इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष राहुल वरवंटीकर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचलन डॉ. अजित मुळजकर, डॉ. नरेश पिनमकर, डॉ. हंसराज भोसले, डॉ.गोविंद शिवशेट्टे यांनी केले तर आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले.

दिव्य मराठी
लातूर जिल्हा 05-02-2024

# कला, मूर्तिशास्त्र परिषदेची सांगता

## दक्षिण भारताच्या इतिहासाचे नवे पान निर्माण होईल: डॉ. सोमनाथ रोडे

**प्रतिनिधी | निलंगा**

मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचा अभ्यास करणारे अभ्यासक, संशोधकांची महाराष्ट्रात कमी नाही परंतु प्राचीन इतिहास अभ्यासक व संशोधकांची मात्र प्रचंड वाणवा आहे, अशा संशोधकांची संख्या वाढली पाहिजे. मूर्ती व स्थापत्यशास्त्रावर आधारित झालेली ही इतिहासाची राष्ट्रीय परिषद दक्षिणेच्या इतिहासात नवे पान निर्माण करेल असा आशावाद इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केला. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दोन दिवस चाललेल्या या राष्ट्रीय परिषदेसाठी इतिहास अभ्यासक, संशोधकांनी आपले संशोधनपर लेख सप्रमाण सादर केले.



महाराष्ट्र महाविद्यालयात कला स्थापत्य व मूर्तीशास्त्र परिषदेप्रसंगी मान्यवर.

### बौद्ध स्तुपाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन

परिषदेत डेक्कन कॉलेज, पुणे येथील डॉ. श्रीकांत गणवीर यांनी बौद्ध स्तुपाच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. तेलंगणा आणि पॅरिस येथील शिल्पसंग्रहालयातील शिल्पांच्या आधारे त्यांनी सिद्धार्थ गौतमाचा जन्म, यक्ष, शाक्य परंपरा, लोकपाल,धम्मचक्र प्रवर्तक सूक्त यावर प्रकाश टाकला. निलंगा शहरातील प्रत्यक्ष मंदिर पाहणी अभ्यास सत्रात डॉ. अरविंद सोनटक्के यांनी मंदिर स्थापत्य व मंदिराच्या आतील व बाह्यांगावरील प्रतीमांवर सूरसुंदरी, देवांगना की नायिका या विषयाच्या अनुषंगाने सप्रमाण मांडणी केली.